**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. १**

**सं.फौ.ख. क्र. ७३१/२०२२**
**सरकार वि. विकास भिलारे**
**नि.क्र. ८ खाली**

**मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो ते खालीलप्रमाणे की,**

नाव :– अशोक तुकाराम धुमाळ,
वय :– ४९ वर्षे, व्यवसाय–शेती,
राहणार – पांडेवाडी, ता. वाई, जि. सातारा.

**सरतपास सहाय्यक सरकारी वकील सौ.एस.आर.जाधव यांचेमार्फत सुरु :–**

दि. २९.०५.५०२२ रोजी मी माझी दुचाकी क्र. एम.एच.११ बी.आर.३९१३ या वाहनाने वाईहून माझ्या घरी म्हणजेच मौजे पांडेवाडी येथे जात होतो. ती दुपारी २.३० ते ३.०० वाजताची वेळ होती. मी भुगाव स्टॉपजवळ पोहोचलो असता तेथे असलेल्या मारुती स्वीफट क्र. ९११४ या वाहनासमोर पडलो. ते मारुती वाहन थांबलेले होते किंवा सुरु होते याविषयी मला सांगता येणार नाही. मी त्यावेळी तोल जाउन पडलो होतो. पडल्यामुळे माझ्या डाव्या पायाला, डाव्या खांदयाला लागले होते. तेथे जमलेल्या लोकांनी मला उपचाराकरीता घोडवडेकर हॉस्पीटल वाई येथे आणले. त्यावेळी मला शुध्द नव्हती. मला त्याचदिवशी सिटी हॉस्पीटल कराड येथे दाखल करण्यात आले. पोलीसांनी त्या दवाखान्यात माझा जाबाब नोंदविला होता. ते कराडचे पोलीस होते. तो जबाब किती नोंदविला होता या विषयी मला सांगता येणार नाही. आता मला सिटी हॉस्पीटल कराड येथे दि. ०८.०६.२०२२ रोजी नोंदविण्यात आलेला माझा जबाब दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूराबाबत मला माहिती नाही. मी आरोपी विकास भिलारे हयास ओळखत नाही. वाई पोलीसांनी माझेकडे कोणतीही चौकशी केली नव्हती तसेच माझा जबाब नोंदविला नव्हता.

**साक्षीदार अभियोगपक्षाच्या कथनास समर्थन करीत नसल्याने सहायक सरकारी अभियोक्ता हयांनी त्यास उलटतपासाच्या स्वरुपात काही प्रश्न**

**विचारण्याची परवानगी मागीतली. ती परवागनी देण्यात आली.**

हे म्हणणे खरे नाही की, मी भुगाव स्टॉपजवळ पोहचलो असता त्यावेळी एक पांढ–या रंगाची मारुती स्वीफट क्र. एम.एच.११ बी.एच.९११४ रस्त्याच्या मधोमध उभी होती. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी त्या कारमधील मागे डाव्या बाजुला असलेला दरवाजा त्यातील प्रवाशाने अचानक उघडला व तो माझ्या खांदयाला लागला आणी त्यामुळे मी खाली पडून माझ्या डाव्या खांदयाला दुखापत झाली. हे म्हणणे खरे नाही की, ती कार त्यावेळी आरोपी विकास भिलारे हा चालवित होता व त्याने ती रस्त्याच्या मध्यभागी उभी केल्याने अपघात घडला होता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीच्या चुकीमुळे मला गंभीर स्वरुपाची दुखापत झाली होती. आता मला दि. ०८.०६.२०२२ रोजीच्या माझ्या खबरी जबाबातील अधोरेखांकित भाग अ वाचून दाखविण्यात आला. तसे मी पोलीसांना सांगीतले नव्हते. तो बरोबर नाही. तो पोलीसांनी का लिहून घेतला याचे कारण मला सांगता येणार नाही. आता मला दि. १०.०७.२०२२ रोजीच्या माझ्या पुरवणी जबाबातील अधोरेखांकित भाग अ वाचून दाखविण्यात आला. तसे मी पोलीसांना सांगीतले नव्हते. तो बरोबर नाही. तो पोलीसांनी का लिहून घेतला याचे कारण मला सांगता येणार नाही.

हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत प्रकरणात आरोपीशी माझी तडजोड झालेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे त्यास वाचविण्याकरीता मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. भाडळकर** –

उलटतपास नाकारला.

फेरतपास काही नाही.

समक्ष/श्रवणोत्तर स्वीकृत

(आर. एम. भेंडे)

दिनांक :– १२/०४/२०२३

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, वाई